## प्रकरण पहिले

### कवी "बी" चे चरित्र (१८७२-१९४७) -

कवी "बी" हे टोपण नाव घेऊन मराठी काव्यरसिकांना आपल्या अमृतमधुर गुंजारवाने मोहिनी घालणाऱ्या कवीचे नाव आहे "श्री.नारायण मुरलीधर गुप्ते".

नारायणराव हे जातीने चांद्रसेनीय कायस्थ प्रभू. त्यांचे घराणे मूळचे कुलाबा जिल्ह्यातील वाशी गावचे. वाशी या गावात त्यांचे दीर्घकालीन वास्तव्य असल्यामुळे त्यांना वाशीकर गुप्ते असे म्हणत. कवी "बी" चे वडील कै.मुरलीधरपंत हे सरकारी नोकरीत होते. पुढे ते उत्तम वकील झाले. त्यांना पाच मुले व तीन मुली होत्या. "बी" हे सर्वांत मोठे होते.

### १.१ जन्म -

"बीं" चा जन्म इ.स.१८७२ मधे जून महिन्यात बुलढाणा जिल्ह्यातील "मलकापूर" गावी झाला. त्यांच्या जन्मदिनाबद्दल मात्र कोठेच काही उल्लेख आढळत नाही. "बी" हे सरकारी नोकरीत होते त्यामुळे त्यांच्या "पेन्शन केस" मधे त्यांच्या जन्मतारखेचा दिवस असणे शक्य आहे. ते सेवानिवृत्त झाल्याची तारीख १ जून १९३० आहे त्यावरून १ जून हीच त्यांची जन्मतारीख असेल असे वाटते. "बी" ज्या शाळेत शिकले, त्या शाळेतील कागदपत्रात त्यांची जन्म-तारीख नक्कीच असेल परंतु दरम्यान इतका काळ लोटला, बरीच स्थित्यंतरे झाल्याने ही कागदपत्रे मिळवणे अशक्य वाटते. "बी" यांना आपली जन्मतारीख माहित असेल परंतु त्यांनी आपल्या जन्मतारखे संबंधी कुठेच उल्लेख केलेला आढळत नाही. "बीं"चे जावई श्रं. गो. प्रधान यांनी जन्मतारीख मिळविण्याचा प्रयत्न केला होता पण तो ही यशस्वी झाला नाही. श्री.वा.ना.देशपांडे यांनी "बीं" ना पत्र पाठवून माहिती विचारली होती ती अशी - "वडिलांचे पूर्ण नाव काय ? ते कोण व कोठे होते ? आपल्या घराण्यात कुणास वाड्.मयप्रेम होते का ?

आपली जन्मतारीख काय १ आपले बालपण कुठे व कसे गेले १ शिक्षण किती व कुठे झाले १ विवाह कधी झाला १ पत्नी कधी वारल्या १ मुले व मुली किती आहेत १ त्यांची नावे १ ती काय करतात १ या सर्व प्रश्नांची उत्तरे "बीं"नी फारच त्रोटक दिली. ती अशी - "ही माहिती "फुलांच्या ओंजळी" च्या प्रकाशकाने दोन शब्दाखाली दिलेली आहे. ती पुरेशी आहे. दोन ज्ञानेश्वर, दोन रघुनाथपंडित, दोन वामन पंडित असा वाद माझ्यासंबंधी होणार नाही." "बीं"कडून असे उत्तर आल्याने त्यांची जन्मतारीख अज्ञात राहिली. "बीं"च्या शाळेतील दाखल्यावरून जन्मतारीख उपलब्ध होण्याची शक्यता होती. तथापि "बीं"नी आपल्या मृत्यूपूर्वीच आपल्याजवळील कागदपत्रे नष्ट केली त्यामुळे तो ही दुवा नष्ट झाला".(१)

आजतरी आपल्याला सन १८७२ जून महिना यावरच समाधान मानावे लागते.

## १.२ शिक्षण -

"बीं"च्या वडिलांना नोकरीनिमित्त यवतमाळ, वणी येथे रहावे लागे त्यामुळे "बीं"चे शिक्षण यवतमाळ व पुढे अमरावतीला झाले. पुढे "बीं"चे वडील मुरलीधरपंतांचे अर्धांगवायूने अकस्मात निधन झाले. वडिलांच्या मृत्यूनंतर एक-दोन महिन्यातच "बीं"ची आई वारली. त्यामुळे कुटुंब पोषणाची जबाबदारी "बीं"वरच पडली. वकील होऊन स्वतंत्र व्यवसाय करण्याची इच्छा असूनही परिस्थितीमुळे मॅट्रीकसुध्दा न होताच त्यांना सरकारी नोकरीत कारकुनीचे काम करावे लागले.

## १.३ विवाह -

"बीं"चा विवाह लहाणपणीच वणीच्या तहसील कचेरीतील कारकून मार्तंडराव प्रधान यांच्या मुलीशी झाला. दुर्दैवाने ती लवकरच वारली. पुढे यवतमाळ येथील कै. गोविंदरावजी सुळे यांच्या मुलीशी "बीं"चा दुसरा विवाह

झाला. त्यावेळी त्यांचे वय १६-१७ वर्षांचे होते. त्यांच्या दुसऱ्या पत्नीचे नाव होते लक्ष्मीबाई.

"बीं"चे आई-वडील वारले तेंव्हा त्या कुटुंबात "बीं"ची पत्नी, त्यांची भावंडे आणि बाळूमावशी अशी माणसे होती. वयाने व अनुभवाने मोठया असणाऱ्या बाळूमावशींनी घरप्रपंचाची जबाबदारी उचलल्यामुळे "बीं"वरचा प्रपंचाचा भार हलका झाला. बाळूमावशी बालविधवा होत्या. त्या कर्मठ नव्हत्या पण सोवळे-ओवळे पाळीत नसत. विधवा असूनही तत्कालीन रिवाजाप्रमाणे त्यांनी केशवपन केले नव्हते यावरून तत्कालीन सुधारणावादी विचारांचा परिणाम त्यांच्या घराण्यावर झालेला दिसतो. बाळूमावशीच्या या संस्काराचा ठसा त्यांच्या काव्यावर उमटलेला दिसतो.

१.४ पत्नी -

"बीं"च्या पत्नीचे नाव लक्ष्मीबाई "त्यांची शरीरयष्टी मध्यम बांध्याची व भरपूर उंचीची होती. वर्ण निमगोरा, डोळे सतेज, चेहरा आनंदी व हसतमुख असे. कामसू वृत्ती व लाघवी स्वभाव यामुळे दीर, जावा, नणंदा यांना त्या हव्याहव्याशा वाटत. लक्ष्मीबाईंचे शिक्षण मराठीपुरते मर्यादित होते." (२) आपल्या पतीच्या आवडी-निवडी, कडक शिस्त व व्यासंग त्या अतिशय कटाक्षाने सांभाळत.

"बीं"च्या वत्सला, कमळा, लीला, गंगा आणि यमुना या पाच मुली. वत्सला हिचा विवाह "बीं"चे भाचे श्री. खंडेराव गोपाळ प्रधान यांच्याशी झाला. दुसरी कमळा ही मुंबईस श्री. निलकंठ नारायण चित्रे यांना दिली. तिसरी श्री. वासुदेवराव राजे यास दिली, चौथी गंगा १२ वर्षांची असताना तिला गंडमाळा होऊन त्यातच ती वारली आणि पांचवी यमुना ही मुंबईस श्री. दामोदरपंत विनायक कारखानीस यांना दिली. त्या सासरी सुखासमाधानाने नांदत होत्या.

पुढे लक्ष्मीबाईंनाच आपल्या सासऱ्याप्रमाणे अर्धांगवायूचा झटका आला.

"बीं"नी त्यांना बरे करण्यासाठी खूप प्रयत्न केले. वैद्य, डॉक्टर, घरगुती औषधे त्याचबरोबर हवाबदल करण्यासाठी माळेवाडी या भोरजवळील एका खेडयात राहिले. एवढेच नव्हे तर त्यांची प्रकृती सुधारावी या हेतूने त्यांनी आपला एकुलता एक मुलगा दत्तात्रेय याचा विवाह "बीं"चे मोठे जावई श्री.प्रधान यांच्या वडिलांची चुलत बहिण कमल, हिच्याशी केला पण उपयोग झाला नाही त्यांच्या प्रयत्नांना यश आले नाही. "तीन वर्षांच्या दीर्घकालीन आजारानंतर दिनांक ११-४-१९३४ रोजी लक्ष्मीबाईंना अकोला येथे देवाज्ञा झाली"(३)आपल्या पतीचा काव्यसंग्रह पाहण्याचे भाग्य दुर्दैवाने त्यांना लाभले नाही.

## १.५ स्वभाववैशिष्टये -

"भरपूर उंची, गौर वर्ण, भव्य भालप्रदेश व चेह-यावरील सात्विक भाव यामुळे त्यांचेकडे चटकन लक्ष जात असे. त्यांचा चेहरा नेहमी प्रसन्न व शांत दिसे त्यांच्या चेह-याप्रमाणे त्यांचे बोलणेही सौम्य असे. सोगे खोचलेले धोतर व सदरा हा त्यांचा घरातील पोशाख, बाहेर जाताना लांब कोट, रेशीमकाठी उपरणे व डोक्याला जरीकाठी पटका असा त्यांचा नेहमीचा पोशाख असे."(४)

"बीं"चा स्वभाव साधा, सरळ पण शिस्त, एकांतप्रिय व मितभाषी असा होता. ते मितभाषी अबोल असले तरी तुसडे मात्र मुळीच नव्हते. आपल्यापासून दुस-यांना त्रास होऊ नये असे त्यांना वाटे. लहान मुलांवर त्यांचे प्रेम होते. नातवंडांना घेऊन ते फिरायला जात असत. नियमितपणावर मात्र त्यांचा विशेष कटाक्ष होता. त्यांच्या दिनक्रमाच्या सगळया वेळा ठरलेल्या असत. शाकाहारी जेवण ते नेहमी घेत. संध्याकाळी कचेरीतून आल्यावर जेवण आटोपल्यावर ते ग्रंथवाचन करीत. ग्रंथवाचन करीत असताना मधून मधून ते धूम्रपान करीत असत.

## १.६ प्रसिध्दीपराङ्मुख वृत्ती -

प्रसिध्दी विषयी ते नेहमीच उदास असत. त्यांनी "बी" हे टोपण नाव घेऊन काव्य लेखन केले. त्यांनी आपले मूळचे गुप्ते हे नाव गुप्तच ठेवले ते त्यांच्या

प्रसिध्दीपराङ्‌मुख वृत्तीमुळेच त्यांना शक्य झाले. त्यांच्या प्रसिध्दीपराङ्‌मुख वृत्तीची काही उदाहरणे आपल्याला सांगता येतील. उदा. १९३४ साली साहित्यसंमेलनाचे अध्यक्ष श्री.नानासाहेब चापेकर होते. "इंदूर येथे होणा-या २५ व्या साहित्यसंमेलनाचे अध्यक्षपद "बी"नी स्वीकारावे, अशी चापेकरांची इच्छा होती. याबाबत त्यांनी "बी"ना दोन पत्रे पाठवून तशी विनंती केली होती. परंतु "बी"नी "साहित्य क्षेत्रापासून मी दिवसेंदिवस लांब जात असून माझा व्यासंगही सुटला आहे. आपण देऊ केलेला बहुमान मी स्वीकारू शकत नाही. दिलगीर आहे. मजपेक्षा व्यासंगी थोर असे अनेक साहित्यिक या मानाचे मानकरी होण्यास योग्य आहेत. त्यांची निवड अनुरूप होईल." (५) असे अगदी विनम्रपणे म्हणाले. "बी"चे हे उत्तर त्यांच्या प्रसिध्दीपराङ्‌मुख वृत्तीला साजेसेच वाटते.

"बी"चे जावई श्री. चित्रे हे गोविंदाग्रज मंडळाचे सभासद होते. कवी "बी" मुंबईस आल्यानंतर मंडळातील सभासदांना "बी"चा परिचय करून देण्यासाठी त्यांना मंडळात घेऊन जाण्याचा दिवस ठरविला. त्यांनी त्यावेळी - "ही भेट कोणत्याही प्रकारची सभा किंवा समारंभ न करता व्हावी असे "बी"नी निक्षून सांगीतले." (६) पुढे मंडळात गेल्यानंतर "आधुनिक कवी व त्यांच्या कविता यावरच चर्चा झाली. पुढे "बी"चा कविता संग्रह प्रसिध्द करण्याचा विषय निघाला तेव्हा "पुढे मागे कविता संग्रह प्रसिध्द करण्याचे ठरविले तर तो प्रकाशित करण्याची पहिली संधी आपणास देईन" असे आश्वासन मंडळाचे सभासद श्री.गो.देशपांडे यांना दिले. या भेटीचा फायदा घेऊन "बी"चा फोटो घेण्याची योजना गुप्तपणे आखली होती. आणि फोटो काढणार तोच - "बी" ताडकन उठले व "धिस वील सिम्पली किल मी" असे जळजळीत निषेधपर उद्‌गार काढून त्यांनी आपला निषेध व्यक्त केला. तसेच "तुमच्या या कृत्यामुळे मंडळाबद्दलची माझी सहानुभूती नष्ट होईल." असेही स्पष्टपणे सांगितले." (७) यावरून प्रसिध्दीच्या ते अजिबात आहारी गेले नव्हते. नव्हे त्यांना प्रसिध्दी नकोच होती हे दिसून येते.

१.७ कलाप्रियता -

कवी "बी" हे मोठे रसिक होते. एखाद्या कवितेचा आस्वाद घेताना ते त्यामधे तल्लीन होत. काव्याचे श्रेष्ठत्व हे गाणाराच्या गोड गळ्यावर नसते तर ते काव्यगुणावर अवलंबून असते असे ते म्हणत. काव्याचा आस्वाद घेताना ते किती तल्लीन होत त्याचे एक मोठे बोलके उदाहरण आहे.

"प्रतिभे"त १९३५ साली तांब्यांची "वचनभंगाचे पाप" ही कविता आली होती. त्यांच्या समग्र कवितेत ती "वाटेच्या वाटसरा" या मथळ्याखाली दिली होती. ती अशी - एका तरूणाचे एका उपवर कुमारीवर प्रेम असते. परंतु पुढे तिचा विवाह दुस-याच तरूणाशी होतो. ती विवाहित असताना हा पहिला प्रियकर तिच्याकडे पाहुणा म्हणून येतो. त्या प्रसंगी तिच्या मनाची जी खळबळ उडते तिचे शब्दचित्र तांब्यांनी मोठ्या मोहकपणे रेखाटले आहे. तिच्यातील

"बिळात झोपे नाग - नको घालू रे फुंकर ।
चाळवून त्याला - नको ओढू रे वर
असावधपणी बोल गेला कधी काळी
भरल्या संसारात - नको फोडू रे । किंकाळी ।

या ओळ्या म्हणताना "बी" रंगून जात ते क्षणभर हातातील बिडी बाजूला धरून म्हणत "वा । त्या स्त्रीच्या मनाचे किती बारीक पापुद्रे उलगडले आहेत" (८) त्यावरून त्यांची रसिकता आपल्या लक्षात येते. त्याचबरोबर तांब्यांची "मधुघट" ही कविता ऐकल्यावरही "बी" म्हणाले होते - "अहाहा, काय सुंदर कविता आहे । पण त्यात कवीची आत्मप्रौढी व्यक्त होते, ते योग्य नव्हे".(९) त्यांचे हे उद्गार त्यांच्या स्वभावाशी सुसंगतच आहेत.

"बी" रसिक होते म्हणूनच प्रेक्षणीय स्थळे पाहण्याची त्यांना हौस होती. पण प्रापंचिक अडचणी आणि नोकरी यामुळे त्यांना आपल्या

हौसेपासून दूर रहावे लागले. तरीही सेवानिवृत्तीनंतर त्यांनी प्रवास केला. काशी, हरिद्वार ओंकार, अलाहाबाद वगैरे ठिकाणी तीर्थयात्रा केली पण भक्तिभावाने देवदर्शनाच्या हेतूने नव्हे, तर सृष्टीसौंदर्याचा मनसोक्त आनंद घेण्यासाठी केली. माथेरानच्या निसर्गसौंदर्याचा आनंद घेण्यासाठी व अमृततुल्य पाण्याची चव घेण्यासाठी प्रत्येकाने एकदा तरी माथेरानला जावे असे ते सांगत.

"बीं"ना माथेरानच्या सृष्टिसौंदर्याचे जसे वेड होते तसेच निसर्गाचे आकर्षण होते. "बी" जेव्हा ओंकार मांधाना गेले त्यावेळी पावसाळा होता. नर्मदा नदीला मोठा पूर आलेला. नर्मदेच्या पुरामुळे होडीत बसून प्रदक्षिणा घालणे धोक्याचे होते. नावाड्यानेही तसे सुचविले पण "बीं"नी प्रदक्षिणा घालण्याचा निश्चयच धरला व आपल्या सर्व कुटुंबियासह होडीत बसून प्रदक्षिणा घातलीच "निसर्गाचे भीषण व रौद्र रूप अनुभवताना कुटुंबातील सर्व मंडळी घाबरून गेली होती, पण "बी" मात्र निसर्गाचे तांडवनृत्य पाहण्यात तल्लीन होऊन गेले होते." [१०] निसर्गाचे सौंदर्य पाहून ते कसे वेडे होत यावरून त्यांची सौंदर्य पहाण्याची तल्लीनता दिसते.

## १.८ दैनंदिनी -

"बीं"ना दैनंदिनी लिहिण्याची सवय होती. त्यांच्या डायरीचे खास वैशिष्टय म्हणजे एखाद्या दिवशी जर महत्वाची गोष्ट घडली नाही तर ते पान ते कोरेच ठेवत. १९३७ सालच्या रोजनिशीतील प्रवासाची माहिती निर्मला कणेकर लिहितात - "एप्रिल १६ नागपूर सोडले, अमरकंटकला जाण्यासाठी रात्री १० वाजता हावरा पॅसेंजर नं.१३ नागपूर ते पेंडरा रोड तिकीट ५ रु.

एप्रिल १७ दिवसा १२ वाजता पेंडरा रोडला दाखल रात्री २।। वाजता गोरेला सोडले. डोली भाडे रु.६"

यावरून त्यांची शिस्तप्रियता दिसते. तर १९३५ सालच्या डायरीत १५ जुलैला "बीं"नी लिहले आहे "मराठी बोर्डाचे सभेत बी.ए.ऑनर्स व

एम.ए.च्या अभ्यासक्रमात "फुलांची ओंजळ" या काव्यसंग्रहाचा समावेश झाला आहे." ११

## १.९ निरपेक्षता -

प्रसिध्दीपराड्.मुख वृत्तीप्रमाणेच ते निरपेक्षही होते. निरपेक्ष भावनेने त्यांनी आपल्या काव्यदेवतेची सेवा केली होती. कोणतीही अपेक्षा न ठेवता ते आपले लेखन करत होते. या निरपेक्ष भावनेमुळेच त्यांनी आपले गुप्ते हे नाव सुध्दा गुप्तच ठेवले होते. त्यांच्या "वेडगाणे" या कवितेने त्यांनी रसिकांचे लक्ष वेधले त्यावेळी "मनोरंजन" मासिकाचे संपादक काशिनाथ नाथपंत मित्र यांनी "बीं"ना कविता पाठविण्याची विनंती केली. त्याबद्दल मोबदला देण्याचेही कबूल केले. परंतु "बीं"नी मोबदला घेणार नाही असे सांगितले व सवडीनुसार कविता पाठवू असे आश्वासन दिले. त्यांची ही वृत्ती पाहून आपणाला प्राचीन मराठी वाड्.मयाच्या इतिहासातील कवी "नरेंद्र" यांची आठवण होते. नरेंद्राने ते गाव सोडले पण आपले काव्य विकले नाही. तो काव्यदेवतेशी एकनिष्ठ राहिला. "बीं"नी "मनोरंजन" मासिकाकडे कविता पाठविल्या पण त्या स्वीकारताना त्यांनी काही अटी कळविल्या.

(१) "कोणत्याही कवितेवर माझे नाव छापता कामा नये, किंवा कोणालाही "बी" हे टोपण नाव मी घेतले आहे, ही गोष्ट सांगू नये.

(२) पाठविलेली कविता जशीच्या तशीच, आतला मजकूर न गाळता, अगर त्यात भर न घालता, अगर -हस्वदीर्घांच्या चुका दुरुस्त न करता जशीच्या तशीच छापावी." १२

"बीं"नी प्रसिध्द होण्याची बिलकूलच अपेक्षा ठेवलेली नव्हती. त्यांच्या कवितेवरुन त्यांच्या नावा गावाचा नकळत सुध्दा पत्ता त्यांनी लागू दिला नाही. बरेच लोक प्रसिध्दीसाठी अगदी उत्सुक असतात. या ना त्या कारणाने प्रसिध्दी मिळविण्यासाठी धडपडत असतात. परंतु "बी" मात्र

या प्रसिध्दीपासून अलिप्त रहात होते. तसेच दुस-या अटीवरुन त्यांना आपल्या लिखाणाबद्दल आत्मविश्वास होता, खात्री होती. ते जे लिहित ते विचारपूर्वक लिहित असे दिसते. एवढेच नव्हे तर "मनोरंजना"चे संपादक "बीं"कडे अंक पाठवू लागले. २-३ अंक मिळाल्यानंतर "बीं"नी त्यांना वार्षिक वर्गणी पाठविली. तेव्हा काशिनाथपंत लिहितात "आपण मोबदला न घेता आम्हाला कविता पाठविता शिवाय वर्षाची वर्गणी भरुन आम्हाला लाजवता तर मी आपणाकडून वर्गणी स्वीकारु शकत नाही. अंक आपल्याकडे नियमितपणे येईल. कृपया स्वीकार करावा." [१३]

आजकालच्या प्रसिध्दीच्या काळात "बी" कवी बद्दल आश्चर्य वाटले तर त्यात वावगे ठरणार नाही. प्रसिध्दीच्या हमरस्त्यावर बसणे त्यांच्या स्वभावात नव्हते. मासिकाकडे कविता पाठविताना त्यांनी मागणी तसा पुरवठा केला नाही. स्वत:ला जे पचले, रुचले, आवडले तेच लिहले. इतरांची पर्वा केली नाही. म्हणूनच ते अट घालतात की, कवितेत कोणत्याही प्रकारची भर न घालता ती जशीच्या तशी छापावी.

### १.१० सौंदर्यदृष्टी -

त्यांची सौंदर्यदृष्टी मार्मिक असल्यामुळे कोणत्याही गोष्टीकडे ते अगदी विचारपूर्वक पहात असत. १९३६ च्या जानेवारीत "ज्ञानप्रकाश" मध्ये "गोविंदाग्रज स्मृतिदिना"चा वृत्तांत आला होता. त्यावेळी माधवराव पटवर्धन यांनी "कविता निर्दोष असावी" या विषयावर दिलेल्या व्याख्यानाचा सारांश होता. पटवर्धनानी अज्ञातवासीची "गडावर चढे मर्द फाकडा" ही कविता उदाहरणाकरिता घेतली होती. तिच्यातल्या प्रत्येक शब्दाचा कीस न कीस पाडला होता. प्रत्येक कल्पनेचे सालडे सोलले होते. एक जवान पठ्ठा शिकार करुन रक्ताने थबथबलेले वाघिणीचे शरीर पाठीवर घेऊन गड चढत आहे. वाघीण फार वजनदार असल्यामुळे ती पाठीवर घेऊन गड चढता येणे शक्य नाही. असा आक्षेप पटवर्धनांनी घेतला होता. तो वाचून "बी"

मनातल्या मनात हसले व म्हणाले, "या पध्दतीने जर टीका केली तर, काव्यातील सौंदर्य टिकणार नाही. सौंदर्याचा साक्षात्कार हा संश्लेषणात असतो तो विश्लेषणात नसतो. एखाद्या युवतीच्या सुंदतेचे समीक्षण करताना जर तिचे डोळे काढले, कान तोडले व नाक कापले तर ते कितपत उचित ठरेल ?" [१४]

सावरकरांची लिपिसुधारणा सौंदर्यघातक आहे. त्याविषयी ते म्हणतात - "सध्याची नागरी अक्षरे ही उत्क्रांत झालेली आहेत. टंकयंत्र किंवा मुद्रणायंत्र यांच्या सोईसाठी त्यांचे विडंबन कशाला ? या सुधारलेल्या लिपीतील शिरोरेखारहित अक्षरे ही बोडखी असल्यामुळे अशुभ वाटतात. आम्ही सोय व सवय पाहून यांचा विचार करतो. परंतु सुंदरतेकडे दुर्लक्ष करतो हे चुकत नाही काय ? " [१५] "बी"चे काव्य समिक्षण मार्मिक व सूक्ष्म होते हे दिसते.

१.११ <u>व्यासंग</u> -

"बी"ना वाचनाची फार आवड होती. काव्य हा त्यांचा आवडता विषय असला तरी इतरही ग्रंथाचे वाचन ते करीत असत. विशेषत: संतसाहित्यावर त्यांचा विशेष भर होता. त्याबरोबरच इंग्रजी, मराठी व संस्कृत या तिन्ही भाषातील ग्रंथाचे वाचन ते करीत. प्राचीन मराठी कवीत ज्ञानेश्वर, तुकाराम, मुक्तेश्वर, वामनपंडित, मोरोपंत यांच्या काव्याचे वाचन त्यांनी वारंवार केले होते. तसेच रामजोशी, होनाजी बाळा या लावणीकाराबद्दल त्यांना विशेष प्रेम वाटत होते.

आधुनिक कवींपैकी केशवसुत, टिळक, विनायक आणि गोविंदाग्रज यांचे काव्य त्यांनी वाचले होते. गोविंदाग्रज, बालकवी व नागेश या कवींबद्दल त्यांना आदर वाटत होता. "नागेश कवीना त्यांनी "काव्यविटपारूढ कोकीळ" अशा सन्मानाने संबोधले असून आहे ती रुचिरा निसर्गमधूरा नागेश वागीश्वरी" अशी त्यांच्या काव्याची प्रशंसा करतात. [१६] तर बालकवी विषयी वाटणारा जिव्हाळा ते पुढील शब्दात व्यक्त करतात -

"काव्यगगनांगणागत अति विमल तारा" [१७]

इंग्रजी कवी वर्डस्वर्थ, शेले, कोलरिज, ब्राउनिंग, शेक्सपिअर व स्कॉट यांच्या काव्याचा त्यांनी अभ्यास केला होता. "कोलरीजच्या काव्यातील भव्य, विशाल कल्पनाविलास आणि टेनिसन कवीच्या लालित्यगुणाची ते फार स्तुती करत. संस्कृत कवी भवभूतीच्या काव्यातील ओज आणि भावनांचे आर्दव यामुळे भवभूतीवर "बीं"चा विशेष भाव होता. याशिवाय तत्वज्ञान, समाजशास्त्र व राज्यशास्त्र यांचे वाचनही ते करीत. कार्ल मार्क्सचे चरित्र वाचून मार्क्सवादाचा अभ्यास त्यांनी केला होता" [१८]

नाट्यशास्त्र व नाटके यांचीही आवड "बीं"ना होती. नाटकाच्या व्यासंगाविषयी ते श्री.वा.ना.देशपांडे यांच्या जवळ म्हणतात -
"नाट्यशास्त्र व नाटके यांचा आपला व्यासंग असून नाट्यरचना करण्याची आपली उत्कट इच्छा होती पण प्रतिकूल परिस्थितीमुळे तो योग आला नाही." [१९]
"श्री.कृ.कोल्हटकरांनी मला मस्तानीवर नाटक लिहिण्यास सांगितले होते ते सहज बोलता बोलता त्यांचे जावई श्री.नी.ना.चित्रे यांच्या जवळ बोलले होते." [२०]
"बीं"ची विविध क्षेत्रातील ज्ञान संपादन करण्याची हौस दिसून येते व त्यांच्या प्रचंड व्यासंगाची कल्पना येते.

१.१२ अप्रसिध्द आठवणी -

"बी" कवी चरित्र व काव्यचर्चा, या पुस्तकातील प्रस्तावनेत श्री.वा.ना.देशपांडे यांनी "बीं"च्या चार अप्रसिध्द आठवणी सांगितल्या आहेत.

(१) " "बी" हे मॅट्रीक देखील नव्हते. तरी पण त्यांचे इंग्रजी भाषेवर उत्तम प्रभुत्व होते. अकोला येथील कलेक्टरच्या कचेरीतील "बीं"च्या दोघातिघा सहका-यांनी मला सांगितले होते की, इंग्रजी मसूदे लिहिण्यात "बी" अतिशय वाक्बगार होते. त्यामुळे त्यांचे वरिष्ठ

अधिकारी महत्वाच्या प्रश्नावरील मसुदे तयार करण्याचे काम बहुधा त्यांच्यावरच सोपवित असत.

(२) यवतमाळचे "बीं"चे चुलत मेव्हणे कै.गणपतराव सुळे मला एकदा सांगत होते की, सेवानिवृत्तीनंतर आणखी काही कविता लिहिण्याचा "बीं"चा विचार होता, परंतु पत्नीच्या दीर्घकालीन आजारामुळे त्यांना तो विचार अंमलात आणता आला नाही. पुढे पत्नीचे त्या आजारात निधन झाले. त्यानंतर गणपतरावांची "बीं"शी केव्हा तरी भेट झाली त्यावेळी त्यांनी "बीं"ना विचारले "काय आता काही काव्यलेखन होत आहे की नाही ?" यावर "बी" क्षणभर थांबून गंभीरपणे म्हणाले, छे, तूर्त तरी नाही. डोळ्यापुढे सारखी पत्नीच येते." काही काळाने मनाला आवरून "बीं"नी थोड्या नवीन कविता लिहल्या. हा भाग वेगळा पण ही आठवण त्यांच्या पत्नीप्रेमाची द्योतक आहे.

(३) तरुण व होतकरू लेखकास मदत करण्यास "बी" सदैव तयार असत. अकोला येथील स्टेट बँकेत काही काळ नोकरीस असलेले कै.वामन गंगाधर कुलकर्णी हे असेच नवशिके कवी होते. त्यांना काव्य-लेखनात "बीं"नी पुष्कळ मदत केली. ते माझ्याजवळ कृतज्ञपणे म्हणाले होते की, "नारायणरावांनी मला हात धरून कविता लिहावयास शिकविले." कुलकर्णी यांची एक कविता "बी" यांनी बरीच दुरुस्त केली होती. तिचा सबंध पहिला चरण "बी" यांचाच होता. तो असा -

"हा खबरदार, हो फिदा न पागल बाह्य झळफळीवरी" या कवितेचे शीर्षक मला आठवत नाही, पण ती बहुधा "महाराष्ट्र साहित्यात प्रसिध्द झाली असावी. यावरून आपणाला त्यांना दुसऱ्याला प्रेरणा देण्याची वृत्ती दिसून येते.

(४) कवी टिळकांचे सुपुत्र परलोकवासी श्री.देवदत्त नारायण टिळक यांनी मला अशी आठवण सांगितली होती की, "एकदा "बी" नाशिक येथे आले होते. ते सेवानिवृत्त झाले होते. मी त्यांच्या भेटीला गेलो होतो व पुष्कळ मनमोकळे बोलणे झाले. जेव्हा मी जावयास निघालो, तेव्हा टिळकांचा मुलगा तो आपलाही मुलगा या भावनेने "बी" यांनी मला खाऊ म्हणून एक रुपया खिशातून काढून दिला. त्यांचा हा प्रेमळपणा पाहून माझे डोळे भरून आले." ही आठवण सांगत असताना सुध्दा दत्तोपंत अगदी भारावून गेले होते. "बी" यांचे निवृत्तीवेतन फक्त रु. ४१-१३-० होते, हे लक्षात घेतले म्हणजे त्यांनी दिलेल्या एक रुपयाचे मोल कळेल." [२१] या चारही आठवणी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला साजेशाच आहेत.

१.१३ "बी" आणि इतर साहित्यिक -

"बीं"च्या बद्दल इतर साहित्यिकांनी सांगितलेल्या काही आठवणी सौ.कणोकर सांगतात.

१.१४ गोविंदाग्रज आणि "बी" -

गोविंदाग्रजाबद्दल त्यांना विशेष ओढ होती. गोविंदाग्रजांना पहाण्यासाठी ते एक दिवस मुंबईहून पुण्यास गेले होते. त्यावेळी गोविंदाग्रज आणि "बीं"ची भेट झाली. या भेटीची गोष्ट सौ. निर्मला कणोकर यांनी श्री.प्रधान यांच्याच शब्दात सांगितली.

"कै.गडकऱ्यांबद्दल त्यांना विशेष आकर्षण वाटत असे. दादासाहेब (बी) त्यांच्या प्रतिभेची नेहमी स्तुती करत. त्यांना भेटण्यासाठी दादासाहेब पुण्याला त्यांच्या निवासस्थानी गेले असता मी ही त्यांच्या बरोबर होतो. ते दोघे माझ्यापेक्षा मोठे असल्याने, मी त्यांच्या बैठकीत बसलो नव्हतो. त्यांचे काय बोलणे झाले हे मला माहित नाही पण एवढे

मात्र चांगले स्मरते की, सकाळी १० वाजता नुसता चहा पिऊन त्यांच्याकडे आम्ही गेलो होतो. गडकऱ्यांना चहाचे व्यसन असावे. कारण दर अर्धा तास झाला की, त्यांच्या खोलीत चहा जात होता. दादासाहेबांची रोजची जेवणाची वेळ टळून गेली तरी त्यांचे बोलणे संपेना व ते बाहेर येईनात, पण एकदम आत जाऊन त्यांना तसे सांगण्याचे धैर्य मला झाले नाही. तसे वागणे शिष्टाचारास सोडून झाले असते. आणि दादासाहेबही रागवले असते. म्हणून मी स्वस्थ बसलो. होता होता १ वाजला तरी ते खोलीबाहेर आलेले दिसले नाहीत म्हणून मी थोड्या धाडसाने त्यांच्या खोलीत जाऊन दादासाहेबांना जेवणाबद्दल सुचविले तेव्हा गडकरी म्हणाले, "आम्ही येथे अमृत प्राशन करत आहोत त्यापुढे जेवणाची मातब्बरी काय ?" अखेरीस या दोन महान साहित्यिकांची वाङ्‌मय चर्चा संपून आम्ही घरी जाण्यास निघालो, तेव्हा चार वाजले होते. तब्बल ६ तास त्यांची चर्चा रंगली होती." [२२] अबोल असले तरी साहित्य चर्चेच्या वेळी "बी" अगदी मनमोकळेपणाने बोलत.

1.14 <u>चिंतामणराव कोल्हटकर आणि बी</u> –

गडकऱ्यांनी आपल्या अखेरच्या क्षणी "भावबंधन" नाटकाचा प्रयोग अकोला येथे "बीं"च्या अध्यक्षतेखाली करावा असे सांगितले होते. चिंतामणराव कोल्हटकर हे बळवंत संगीत मंडळाचे मालक होते. तेव्हा भावबंधन या नाटकाचा प्रयोग करण्यासाठी ही बळवंत संगीत मंडळी अकोल्यास गेली आणि "बीं"च्या निवास स्थानाचा शोध चिंतामणराव करू लागले. तेव्हा त्यांना असे दिसून आले की कवी "बी" म्हणजेच नारायण मुरलीधर गुप्ते. ही गोष्ट खुद्द अकोलेकरांना देखिल माहित नव्हती. त्यावेळी अकोलकरांच्या अरसिकतेबद्दल कोल्हटकरांना दु:ख वाटले व असा महाकवी स्वत:च्या गावात अप्रसिध्द राहू शकतो याचे दु:ख वाटले. "बीं"ना त्यांनी रंगीत तालीम पहायला येण्याची विनंती केली. त्यानुसार कवी "बी" रंगीत तालीम पहायला गेले.

"भावबंधना"च्या पहिल्या प्रयोगाविषयी "बहुस्मीत" कोल्हटकरांनी "बी" विषयी आदर व्यक्त केला आहे. ते लिहितात - "अकोल्याच्या याच मुक्कामात मला तीर्थरूप महाराष्ट्राच्या एका काव्यतीर्थाचे दर्शन घेता आले. तो कवी कारकुनाचे जीवन जगत होता. पण काव्यसागराला भरती आली म्हणजे मुरलीधराप्रमाणे सुस्वराने वातावरण निनादून टाकत होता. अशा एका पुरुषाच्या परिचयाचे भाग्य मला लाभले. त्याचे नाव होते "बी" उर्फ नारायण मुरलीधर गुप्ते. त्यांच्या चेह-याप्रमाणे त्यांचे बोलणेही अतिशय सौम्य होते. सकाळच्या कामासाठी जाताना पोशाखात दिसणारा साधेपणा, सायंकाळी कामावरून परतताना गबाळ्याच्याच वेषात जमा होणारा असे. दिवसभराच्या सरकारी कामाच्या धकाधकीमुळे त्यांच्या विचारांबरोबर त्यांचा पोशाखही कुणी चुरगळून टाकला आहे असे वाटे." [२३]

१.१६ श्री. र. वि. कुलकर्णी -

कवी "बी" नागपूरला असताना श्री. कुलकर्णी "बीं"कडे गेले होते त्यावेळेस "बी" म्हणाले होते. - " "फुलांची ओंजळ" युनिव्हर्सिटीच्या अभ्यासक्रमात नको. कारण अभ्यासक्रमात नेमल्या जाणा-या काव्याचे विडंबन होते. रसिक अंतकरण हीच खरी काव्याच्या मानमान्यतेची जागा". [२४] आधुनिक मराठी काव्याबद्दलचे आपले मत सांगताना "बी" म्हणतात - "इंग्रजी व्यतिरिक्त अन्य भाषातील श्रेष्ठ ग्रंथ राजांची आपणास ओळख नसल्यामुळे केवळ इंग्रजी वाड्.मयावरून किंवा त्या भाषेत भाषांतरित झालेल्या काही ग्रंथावरूनच होणार. त्या दृष्टीने पाहाता आपल्या मराठी भाषेत कवितांचा संभार फार मोठा आहे. परंतु या पर्णसंभारात सौगंध फारसा नसतो. [२५] असे आपले विचार प्रकट करतात.

१.१७ नागेश -

यांचा "बीं"शी प्रत्यक्ष ओळख, परिचय नव्हता, पण "बीं"चे

काव्य त्यांनी वाचले होते. त्या काव्यावर नागेश भाळले होते. "बीं" विषयी त्यांना आदर वाटत होता. पण अखेरपर्यंत "बीं"ची भेट झाली नाही. "बी" कवींचा व नागेशांचा परिचय होता का हे जाणून घेण्यासाठी भ.श्री.पंडित यांनी नागेशांना विचारले असता नागेश लिहितात -
"मी त्यांना अखेरपर्यंत पाहिले नाही.असे असले तरी माझा आंतरिक संबंध मात्र घनिष्ठ होता. त्यांच्या कवितेवर मी भाळून गेलो होतो व अजूनही आहे हे मी मोठ्या आनंदाने कबूल करतो. त्यांचे कोणतेही काव्याक्षर मला अक्षर वाङ्.मय वाटत होते व अजून वाटते. त्यांच्या काव्यवैभवाने मोहरून जाऊन त्यांच्यावर मी एक कविता लिहली तिचे नाव मधमाशी. ती वाचण्यात आल्यावर "बीं"नी "नागेश" शिर्षकाखाली विविधज्ञान विस्तारात आपली कविता प्रसिध्द केली. मला आशीर्वाद देऊन गौरविले. या कवितेबद्दल पत्र पाठवून आभार मानण्यासही मी धजलो नाही. इतके हे व्यक्तिमत्व मला भारी वाटले. "बी" परत न येण्याकरिता गेले नि मी ढसढसा रडलो." २६
त्यांच्याशी प्रत्यक्ष ओळख नव्हती तरीही अंतकरणातून काव्याच्या माध्यमातून एकमेकावर अपार प्रेम करणारे हे खरे साहित्यिक वाटतात.

१.१८ <u>अनिल आणि बी</u> -

यांचे फार जिव्हाळ्याचे संबंध होते. अशाच त्यांच्या एका भेटीत मुक्तछंदाविषयी चर्चा झाली होती. त्यावेळी "बीं"नी मुक्तछंदास विरोध दर्शविला. परंतु नंतर त्यांना मुक्तछंदाचे विचार पटले तेव्हा ते ताबडतोब अनिलांना भेटले व म्हणाले "माझे मुक्तछंदाबद्दचे मत बदलले आहे. मी तुमच्या मताशी सहमत आहे. असे ते अनिलांना नि:संकोचपणे सांगतात यावरून त्यांचा विनयशील स्वभाव दिसून येतो.

१.१९ <u>"बीं"चे लेखन</u> -

"बीं"नी "फुलांची ओंजळ" या काव्यसंग्रहाव्यतिरिक्त आणखी काही

गद्य लेखन केले आहे. दुर्दैवाने आज ते उपलब्ध नाही. निर्मला कणेकर सांगतात "नवजीवन" च्या १९३३ सालच्या दिवाळी अंकात श्री.गो.देशपांडे यांचा श्री."बी" या शिर्षकाखाली लेख आहे त्यात "बी"च्या गद्यलेखनासंबंधी लिहितात -

व-हाडात पूर्वी निघत असलेल्या "बेरार समाचारा"त निरनिराळ्या नावाखाली अथवा नावाशिवाय त्यांचे पुष्कळ लेख आणि कविता प्रसिध्द आहेत. कै.हरिभाऊ आपटे यांच्या "करमणूक" पत्रात ही त्यांनी अनेक लघुकथा, कविता आणि टीकालेख लिहून प्रसिध्द केले आहेत." २७

"बी"चे जावई श्री.प्रधान सांगतात - "बी"नी योगाभ्यासातील प्रत्येक आसनावर विस्तृत टिपणे इंग्रजीतून लिहून ठेवली होती. त्यांनी २-३ नाटकेही लिहिण्यास घेतली होती. ती अर्धवट लिहलेली नाटके, काही अपु-या कविता, योगाभ्यासावरील टिपणे व साहित्यिकांशी झालेला पत्रव्यवहार ही सर्व कागदपत्रे त्यांनी त्यांचे जावई श्री.प्रधान यांच्या गैरहजेरित जाळून टाकली." २८

"बी"चे स्नेही रामदासपंत देशपांडे सांगतात - "बींच्या अपु-या, राहिलेल्या दोन कविता "युगवाणी" मधे "बी"च्या सहवासात या लेखात खुळा कवितेची मध्यवर्ती कल्पना आली होती. "कमळणी" व खुळा" या मी वाचल्या होत्या. शक्यतो आपल्या अपु-या कविता कधी कुणाला दाखवत नसत. कोणी त्याबद्दल विचारले तर "कविकन्येला नग्नावस्थेत पहाणे इष्ट आहे काय? " असा प्रश्न विचारून ते त्याला निरुत्तर करत." २९

## 1.20 "फुलांची ओंजळ" काव्यसंग्रहाचे प्रकाशन -

कवी "बी"चा कवितासंग्रह प्रकाशित करण्याचा मान आपल्याला मिळावा अशी ब-याच रसिकांची इच्छा होती. त्यापैकी हरिभाऊ मोटे - कवी "बी"चा काव्यसंग्रह आपल्याला प्रकाशित करायला मिळावा अशी

मोटे यांची फार इच्छा होती. त्या दृष्टीने ते प्रयत्नही करीत होते. श्री.वा.ना.देशपांडे यांच्याकडून मध्यस्थी पण केली. तरीही प्रयत्नास यश आले नाही. हरिभाऊंनी काही रक्कमही देऊ असे सांगितले पण काव्यदेवतेची सेवा मोबदला न घेता करण्याचे ठरविले असे बी म्हणतात. तुमच्या नावाने बक्षीस, शिष्यवृत्ती ठेवतो असेही श्री.मोटे म्हणाले. तेव्हा "बी" म्हणतात – "श्री.गो.देशपांडे यांना गोविंदाग्रज मंडळातर्फे कवितासंग्रह प्रकाशित करण्याचा शब्द दिला आहे". तेव्हा श्री.देशपांडे यांना भेटून त्यांची परवानगी असेल तर माझी हरकत नाही. अर्थात देशपांडे कडून होकार आला नाही. याविषयी हरिभाऊ मोटे म्हणतात – "पुस्तक प्रकाशनाबाबत माझी निराशा झाली, तरी १०–१२ वर्षांपूर्वी दिलेल्या शब्दांचे पालन करणारे "बी" किती थोर आहेत, महान आहेत याची नितांत जाणीव मला झाली व अशा दुर्मिळ व्यक्तिमत्वाच्या दर्शनाचा अलभ्य लाभ मला त्या भेटीत मिळाला." [३०] त्यांना मोबदल्याची अपेक्षा तर नव्हतीच पण त्या मोबदल्याच्या आहारी न जाता दिलेला शब्द पाळणारे "बी" होते. आपल्या तत्वाला व निष्ठेला जपणारी माणसे कशी असतात याचे दर्शन "बीं"च्या माध्यमातून घडते.

श्रीयुत श्री.गो.देशपांडे – श्री.देशपांडे हे "बीं"चे दुसरे जावई श्री.नी.ना. चित्रे यांचे दूरचे नातेवाईक. श्री.देशपांडे यांना "बीं"च्या कविता आवडत होत्या. त्यांनी "बीं"च्या कवितांचा संग्रह केला होता. श्री.देशपांडे यांनी "बीं"चा परिचय करून घेतला. त्यांना संग्रहित केलेल्या कविता दाखविल्या. त्यावेळी "बीं"ना आश्चर्य वाटले कारण "बी" कविता लिहिली की संपादकाकडे पाठवीत. तिची दुसरी प्रत कधीच तयार करीत नसत. नंतर "बी" म्हणाले या संग्रहात "करमणुकीतील "प्रणयपत्रिका" ही कविता नाही. गोविंदाग्रज मंडळाला "बीं"नी भेट दिली होती. त्याचवेळी "बीं"कडून कवितासंग्रह प्रकाशित करण्याचे आश्वासन श्री.देशपांडे यांनी मिळविले होते.

पुढे "बी"नी श्री.देशपांडे यांना दिलेले आश्वासन लक्षात ठेवून पुस्तक प्रकाशनाची परवानगी दिली. पुस्तक प्रकाशनाची बोलणी चालू असताना "बी" म्हणाले होते, "पुस्तकाच्या बाह्यांगाला आपण विशेष महत्व देत नाही. व मोबदला म्हणून काहीही न घेण्याचा संकल्प केला असल्याचे सांगितले." [३१] पुस्तकाला अत्रे यांची प्रस्तावना घेण्याचा विचार आहे असे श्री.देशपांडे "बी"ना म्हणाले त्याबाबत आपली हरकत नसल्याचे "बी"नी सांगितले. श्री.देशपांडे यांनी आचार्य अत्रे यांना विनंती केली व अत्र्यांनीही ती मान्य केली. नंतर अत्रे आणि "बी" यांचा पत्रव्यवहार बरेच दिवस चालू होता. त्यातून अत्र्यांनी "बी"ना शंका, प्रश्न विचारून कविता समजावून घेतली व त्यांच्या काव्यसंग्रहास अत्यंत उत्कृष्ट व प्रदीर्घ अशी प्रस्तावना लिहिली. केवळ अत्र्यांच्या प्रस्तावनेमुळेच त्यांच्या व्यक्तिमत्वाची ओळख महाराष्ट्राला झाली.

यानंतर पुस्तकासाठी फोटोबद्दल "बी"ना विचारले तेव्हा त्यावेळेपर्यंत त्यांचा एकही फोटो काढलेला नसल्याचे समजले. प्रकाशक, मित्रमंडळी, नातेवाईक यांच्या आग्रहाखातर "बी" फोटोसाठी तयार झाले. हाच फोटो "फुलांची ओंजळ" च्या प्रथमावृत्तीमधे आहे.

"१० जुलै १९३४ रोजी "बी"चा कवितासंग्रह प्रकाशित झाला." [३२]

1.29 आयुष्याची अखेर -

कवी "बी" यांना दिनांक ३० ऑगस्ट १९४७ रोजी रात्री १ वाजून ४५ मिनिटांनी नियतीला सामोरे जावे लागले.

गुरुवार दि.२८-८-४७ पासून त्यांना थोडी थोडी चक्कर येत असल्याचे त्यांनी सांगितले. तेव्हा डॉक्टरांनी अशक्तपणामुळे तसे होते असे सांगितले. ३-४ तासांच्या अंतरांनी त्यांना चक्कर येत होती व ८-१० मिनिटांनी बरे वाटत होते. शुक्रवारी त्यांचे जावई श्री.प्रधान यांनी "बी"ना हिंदुस्थान टाईम्स" वाचून दाखवला तेव्हा विचारले "दादा तुम्हाला श्वास कोंडल्यासारखे

वाटते म्हणजे काय होते ? प्राणायाम करण्याच्या वेळी जसे कोंडल्यासारखे वाटते तसे होते काय ? त्यावर "बी" म्हणाले "छे, छे, बिलकूल वाटत नाही. मनुष्याला उर्ध्वश्वास लागल्यानंतर त्याची एकेक नाडी तुटताना जसे वाटते, त्याप्रमाणे वाटते. पण जागृतावस्थेत हिंडत फिरत असताना या स्थितीचा अनुभव घेण्यात फारच मौज आहे. अशी स्थिती ७-८ मिनीट टिकते व पुन्हा पूर्ववत वाटते." [२३] त्यांच्या मृत्यूसमयी जी स्थितप्रज्ञता दिसते तो त्यांच्या तत्वचिंतनाचा परिपाकच वाटतो. शेवटच्या क्षणा-पर्यंत त्यांचे तत्वचिंतन चालू होते याची साक्ष पटते.

त्यानंतर संध्याकाळी नेहमीप्रमाणे जेवण केले. औषधाचा डोस घेतला. रात्री १२॥ च्या सुमारास "बीं"ची मुलगी वत्सला "बीं"कडे गेली तेव्हा ते जागेच होते. तिने दूध देऊ का विचारले असता त्यांनी होकार दिला. पाच मिनिटांनी जीव घाबरतो व चक्कर येते असे "बी" तिला म्हणाले. तिने आपल्या सासूबाईंना व पतीला बोलाविले. प्रधानांच्या छातीवर डोके ठेवूनच "बीं"नी आपली प्राणज्योत मालविली. एका महान साहित्यिकांचा आत्मा त्यांच्या नश्वर देहाला सोडून गेला होता. आपल्याला एका महान कवीच्या काव्याला मुकावे लागले "तेव्हा १ वाजून ४५ मिनिटे झाली होती. ३० ऑगस्ट १९४७ ला वयाच्या ७६ व्या वर्षी छिंदवाडा येथे त्यांनी आपली प्राणजोत मालविली." [२४]

कवी "बीं"च्या जन्माविषयी जी गोष्ट घडली तशीच त्यांच्या मृत्युबद्दलही एक वाक्यता दिसत नाही.

अर्वाचीन मराठी वाङ्.मय सेवक या ग्रंथात वा.ल.कुलकर्णी यांनी "१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला या मंगलदिनाचे दुस-या दिवशी म्हणजे १६ ऑगस्ट १९४७ या दिवशी "बी" दिवंगत झाले." [२५] असे नमूद केले आहे.

सौ. निर्मला कणेकर म्हणतात - "सह्याद्रीत" "बीं"च्या मृत्यूची

तारीख २९-८-१९४७ ही दिली आहे. "फुलांची ओंजळ" काव्यसंग्रहाची जी दुसरी आवृत्ती प्रकाशित झाली, त्यातील आरंभीच्या जीवन-वृत्तांतात १६ ऑगष्ट ही तारीख नमूद केली आहे." [३६]

"बी"चे देहावसान त्यांचे जावई श्री प्रधान यांच्याकडे झाल्यामुळे प्रधानांनी दिलेली माहितीच सत्य वाटते म्हणून ३० ऑगस्ट १९४७ हीच त्यांच्या मृत्यूदिनाची तारीख मानणे योग्य ठरेल.

## 1.22 सारांश -

चिंतनशील सौंदर्यवादी कवी, यांचे संपूर्ण नाव नारायण मुरलीधर गुप्ते. व-हाड प्रांतातील मलकापूर या गावी जन्म. "बी"च्या आयुष्यातील महत्वाची वर्षे अकोला येथे गेली. शिक्षण यवतमाळ व अमरावती येथे झाले. वकील होऊन स्वतंत्र व्यवसाय करण्याची इच्छा असूनही त्यांना प्रापंचिक अडचणीमुळे मॅट्रीक देखील होता आले नाही. लहाणपणीच आई-वडिलांचे छत्र उडाल्यामुळे प्रपंचाची जबाबदारी ते मोठे असल्यामुळे त्यांच्या अंगावर पडली. त्यामुळे नोकरीचा मार्ग अवलंबावा लागला. कचेरीत कारकून म्हणून ते काम करीत. विवाह ही अगदी लहानपणीच वयाच्या १६-१७ व्या वर्षी झाला.

स्वभाववैशिष्टातील महत्वाचा भाग म्हणजे प्रसिध्दीपराङ्मुख वृत्ती, साधा, सरळ पण एकलकोंडा व मितभाषी स्वभाव. त्याच बरोबर शिस्तप्रियता सचोटी, प्रामाणिकपणा, तत्वनिष्ठा इत्यादी पैलू दिसतात.

ज्ञान संपादन करण्याची आवड असल्यामुळे काव्य हा आवडता विषय तरीही इंग्रजी, संस्कृत, मराठी या ग्रंथांचा सखोल अभ्यास केला होता.

स्वभाव एकलकोंडा असला तरी, साहित्य चर्चेच्या वेळी त्यांच्या चर्चेला भरती येई. निरपेक्ष भावनेने काव्यदेवतेची सेवा केली. आपल्या तत्वाला व निष्ठेला पाळणारे कवी "बी" अखेर ३० ऑगस्ट १९४७ रोजी इहलोक सोडून परलोकी गेले.

या प्रतिभावंतास परिस्थितीची जर अनुकूलता मिळाली असती तर त्यांच्या प्रतिभेला अनेक धुमारे फुटले असते आणि मराठी शारदेच्या वैभवात निश्चितच मोलाची भर पडली असती असे त्यांचे जीवनचरित्र पाहून निश्चित म्हणता येईल.

## प्रकरण पहिले

9.23

## संदर्भ आणि टीपा


१) सौ. कणोकर निर्मला अनंत — "बी" कवी - चरित्र व काव्यचर्चा
प्रकाशक - ग.ल.ठोकळ पुणे
पहिली आवृत्ती - १९७२
पृष्ठ क्र. ४

२) सौ.कणोकर निर्मला अनंत — तत्रैव
पृष्ठ क्र. ६-७

३) सौ.कणोकर निर्मला अनंत — तत्रैव
पृष्ठ क्र. ७

४) सौ.कणोकर निर्मला अनंत — तत्रैव
पृष्ठ क्र. ९

५) सौ.कणोकर निर्मला अनंत — तत्रैव
पृष्ठ क्र. ३८

६) सौ.कणोकर निर्मला अनंत — तत्रैव
पृष्ठ क्र. १६

७) सौ.कणोकर निर्मला अनंत — तत्रैव
पृष्ठ क्र. १६

८) प्रा.पंडित भ.श्री. — आधुनिक कवितेचे प्रणेते
भाग दुसरा
प्रकाशक - दि.मा.धुमाळ
प्रथमावृत्ती - १९७१
पृष्ट क्र. ३२२ - ३२३

९) सौ.कणोकर निर्मला अनंत — "बी" कवी-चरित्र व काव्यचर्चा
प्रकाशक - ग.ल.ठोकळ पुणे
पहिली आवृत्ती - १९७२
पृ.क्र. १२

१०) सौ.कणोकर निर्मला अनंत — तत्रैव
पृष्ठ क्र. ११

११) सौ.कणोकर निर्मला अनंत — तत्रैव
पृष्ठ क्र. १३-१४

१२) सौ.कणोकर निर्मला अनंत — तत्रैव
पृष्ठ क्र. १७

१३) सौ.कणोकर निर्मला अनंत — तत्रैव
पृष्ठ क्र. १७

१४) प्रा.पंडित भ. श्री. — आधुनिक कवितेचे प्रणेते
भाग दुसरा
प्रकाशक दि. मा. धुमाळ, नागपूर
प्रथमावृत्ती - १९७१
पृष्ठ क्र. ३२१

१५) प्रा.पंडित भ. श्री. — तत्रैव
पृष्ठ क्र. ३२१ - ३२२

१६) आचार्य अत्रे - प्रस्तावना — "फुलांची ओंजळ"
कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे
सातवी आवृत्ती १९७६
प्रस्तावना पृष्ठ क्र.७

१७) आचार्य अत्रे — तत्रैव
पृष्ठ क्र. ७

१८) सौ.कणोकर निर्मला अनंत — बी कवी - चरित्र व काव्यचर्चा
प्रकाशक - ग. ल. ठोकळ पुणे
पहिली आवृत्ती १९७२
पृष्ठ क्र. २७

| | | |
|---|---|---|
| १९) | सौ.कणोकर निर्मला अनंत | तत्रैव<br>पृष्ठ क्र. २८ |
| २०) | सौ.कणोकर निर्मला अनंत | तत्रैव<br>पृष्ठ क्र. २८ |
| २१) | सौ.कणोकर निर्मला अनंत | तत्रैव<br>प्रस्तावना - वा.ना.देशपांडे<br>पृष्ठ क्र. २०-२१ |
| २२) | सौ.कणोकर निर्मला अनंत | तत्रैव<br>पृष्ठ क्र.३७ |
| २३) | सौ.कणोकर निर्मला अनंत | तत्रैव<br>पृष्ठ क्र.४१-४२ |
| २४) | सौ.कणोकर निर्मला अनंत | तत्रैव<br>पृष्ठ क्र.४३ |
| २५) | सौ.कणोकर निर्मला अनंत | तत्रैव<br>पृष्ठ क्र.४४ |
| २६) | सौ.कणोकर निर्मला अनंत | तत्रैव<br>पृष्ठ क्र.४४-४५ |
| २७) | सौ.कणोकर निर्मला अनंत | तत्रैव<br>पृष्ठ क्र.१९ |
| २८) | सौ.कणोकर निर्मला अनंत | तत्रैव<br>पृष्ठ क्र.२० |
| २९) | सौ.कणोकर निर्मला अनंत | तत्रैव<br>पृष्ठ क्र.२०-२१ |
| ३०) | सौ.कणोकर निर्मला अनंत | तत्रैव<br>पृष्ठ क्र.३२ |

| | | |
|---|---|---|
| ३१) | सौ. कणेकर निर्मला अनंत | तत्रैव<br>पृष्ठ क्र. ३३ |
| ३२) | सौ. कणेकर निर्मला अनंत | तत्रैव<br>पृष्ठ क्र. ३४ |
| ३३) | सौ. कणेकर निर्मला अनंत | तत्रैव<br>पृष्ठ क्र. ४५ |
| ३४) | सौ. कणेकर निर्मला अनंत | तत्रैव<br>पृष्ठ क्र. ४६ |
| ३५) | खानोलकर गं. दे. | अर्वाचीन मराठी वाङ्मयसेवक<br>चतुर्थ खंड<br>प्रकाशक - गं. दे. खानोलकर, मुंबई<br>प्रथमावृत्ती नोव्हेंबर १९५७<br>पृष्ठ क्र. ३ |
| ३६) | सौ. कणेकर निर्मला अनंत | "बी"कवी - चरित्र व काव्यचर्चा<br>प्रकाशक - ग.ल.ठोकळ पुणे<br>पहिली आवृत्ती - १९७२<br>पृष्ठ क्र. ४६ |